प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी** बी विंग ,पहिला माळा ,

वनभवन ,सिव्हील लाईन्स ,रामगिरी रोड ,नागपूर ००१ ४४०

दुरध्वनी क्र२५५६९१६-०७१२ . , ईमेल-: apccfnodal@mahaforest.gov.in


**ई-मेल व्दारे/महत्वाचे** क्र.कक्ष-१७/२/नोडल/नाशिक/आयडी-१२९२४(१५)/ ४१ /२०२३-२४

नागपूर ४४० ००१, दिनांक ०५/०४/२०२३

**संदर्भ** :- १. महसूल व वन विभाग शासन पत्र क्र.एफएलडी-१५२१/प्र.क्र.२३३/फ-१०,दि.१९/०४/२२

२. आपले कडील पत्र क्रमांक कक्ष-२/जमीन/प्र.क्र.८/२१-२२/१३२१, दि. १०/०३/२०२३

विषयांकित प्रकरणी शासनाने संदर्भिय पत्र क्रमांक १ अन्वये उपस्थित केलेल्या बाबींवर आपण आपले कडील संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये माहिती सादर केली आहे. त्यामध्ये पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या जमीनीचा तपशील, KML Files, गाव नकाशा व ७/१२ उतारा तसेच १० वर्षाचे पर्यायी वनीकरण योजना प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र इत्यादी सादर केल्याचे नमूद केलेले आहे. परंतू त्याची तपासणी केली असता त्या मध्ये खालील बाबींची पुर्तता होणे आवश्यक आहे.

१. KML CD मध्ये प्रस्तावित केलेल्या क्षेत्राच्या Properties नमूद केलेल्या नाहीत. (जसे वनविभाग नांव, वनक्षेत्राचे नांव, वनपरिमंडळ, बिठाचे नांव, सर्वे/गट क्रमांक, एकूण क्षेत्र, क्षेत्राचा प्रकार, इत्यादी )
२. विळवंडी गावाचा गाव नकाशा सादर केलेला आहे त्या मध्ये समाविष्ट सर्वे क्रमांक २४७ अंतर्गत गट क्रमांक ४७६, ४७७, ४९९, व ५२६, ५२७, ५२८,५२९ च्या सीमा गट क्रमांक निहाय सुस्पष्ट पणे दर्शविल्या गेलेल्या नाहीत. त्या दर्शविण्यात याव्या. तसेच गट क्रमांक ५२४ चा जो ७/१२ उतारा सादर केलेला आहे तो प्रस्तावित केलेल्या पर्यायी वनीकरण क्षेत्राच्या व्यतिरिक्त असल्याचे स्पष्ट होते. सदर ७/१२ उता-याच्या प्रस्तावित केलेल्या पर्यायी वनीकरण क्षेत्राबाबत काय संबंध आहे याबाबत स्पष्ट खुलासा सादर करावा.
३. गोगल अर्थ वरील प्राप्त नकाशा पर्यायी वनीकरणाकरिता दर्शविण्यात आलेल्या क्षेत्राबाबत संदर्भ सुची मध्ये उल्लेख केलेला नाही. तो दर्शविण्यात येवून व त्या मध्ये संपूर्ण Properties जसे वनविभाग नांव, वनक्षेत्राचे नांव, वनपरिमंडळ, बिठाचे नांव, सर्वे/गट क्रमांक, एकूण क्षेत्र, क्षेत्राचा प्रकार, इत्यादी नमूद करण्यात याव्यात.

उपरोक्त बाबींची माहिती तत्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावी. जेणेकरून सदर माहिती शासनास विना विलंब सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

५/४/२३.

updated

( नरेश झुरमुरे)

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी

का/प्र
५/४/२३ ५/४/२३.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),

नाशिक

प्रतिलिपी :- उपवनसंरक्षक, पश्चिम भाग नाशिक यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.